# भारतीय ग्रामीण क्षेत्रातील दारिद्र्य – एक आर्थिक अध्ययन

**प्रा. निलेश अरूण दुर्गे**
अर्थशास्त्र विभाग
भगवंतराव कला व विज्ञान
महाविद्यालय एटापल्ली, जि.गडचिरोली
9421115541
profnadurge@gmail.com

**सारांश :–**

*भारताला स्वातंत्र्य मिळून जवळपास ७४ वर्ष पूर्ण झाली आहेत. भारतामध्ये गेल्या ७४ वर्षात महत्त्वाची समस्या म्हणजे दारिद्रय रेषेखालील जनतेचा खालावलेला जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना आलेले अपयश खरे तर गेल्या काही वर्षापर्यंत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या यादीत नाव असणे म्हणजे अप्रतिष्ठेचे लक्षण समजण्यात यायचे, परंतु आता दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या यादीत नाव असणे म्हणजे सर्वांसाठीच चिंतेची बाब ठरत आहे. भारतातील ग्रामीण भागातील दारिद्रय हे दारिद्रयरेषा (Poverty Line) द्वारे मोजले जाते. त्यामध्ये सामान्यता: व्यक्तीला प्रतिदिवस किमान निर्वाह पातळी गाठण्याएवढे उत्पन्न नसणाऱ्या व्यक्तीचा समावेश दारिद्रयात केला जातो. याप्रमाणे भारतातील ग्रामीण क्षेत्रातील दारिद्रयाचे मोजमाप आणि अंदाज व्यक्त करण्याकरिता भारत सरकारने काही समित्या किंवा अभ्यासगट स्थापन केले. समित्यांनी अभ्यास करून काढलेले अंदाज आणि अहवालानुसार भारतातील ग्रामीण क्षेत्रातील दारिद्रयाचे आकडे मिळाले. त्यानुसार भारत सरकारने ग्रामीण क्षेत्रातील दारिद्रय निर्मुलनाकरीता योजना आखण्यास मदत झाली आहे.*

**बीजशब्द :– दारिद्रय रेषा, दारिद्रय निर्मुलन, योजना**

## प्रस्तावना

२१ व्या शतकात भारत आर्थिक महासत्ता होणार असे प्रयत्न आणि स्वप्न पाहणाऱ्या भारतात जगातील ३० टक्के लोक दारिद्रय रेषेखाली राहतात आणि देशातील अधिकाअधिक लोकसंख्या दारिद्र्याखाली ठेवून महासत्ता बनने स्वप्नच राहील यात शंकाच नाही. जोपर्यंत देशातील सर्वसामान्य लोकांना विकास होऊ शकत नाही तोपर्यंत देश जागतिक महासत्ता होण्याचे स्वप्न पुर्ण होऊ शकत नाही.

अलिकडेच देशातील अर्थतज्ञांनी दारिद्रय या महत्वाच्या प्रश्नाकडे लक्ष केंद्रित झालेले दिसून येते. त्यामुळे दारिद्रय म्हणजे आर्थिक दुष्टया कमकुवत स्थिती म्हटले जाते. भारतीय नियोजन मंडळाने (१९६२) मध्ये दारिद्रय म्हणजे किमान मुलभुत गरजा पूर्ण करण्याकरीता आवश्यक असलेल्या उत्पन्नापेक्षा ज्यांचे उत्पन्न कमी असणे होय. भारतातील ग्रामीण भागातील दारिद्रय हे दारिद्रयरेषा (Poverty Line) द्वारे मोजले जाते. त्यामध्ये सामान्यता: व्यक्तीला प्रतिदिवस किमान निर्वाह पातळी गाठण्याएवढे उत्पन्न नसणाऱ्या व्यक्तीचा समावेश दारिद्रयात केला जातो. याप्रमाणे भारतातील ग्रामीण भागातील दारिद्रयाचे मोजमाप आणि अंदाज व्यक्त केला जातो. त्यानुसार योजना आखल्या जातात. त्यापुर्वी आजपर्यंत भारत सरकारने काही समित्या स्थापन करून त्यांनी अभ्यास करून काढलेले अंदाज आणि अहवाल यातून भारतातील ग्रामीण क्षेत्रातील दारिद्रयाची आकडेवारी लक्षात आली आहे.

## संशोधनाची उद्दीष्टे :–

१. भारतीय ग्रामीण क्षेत्रातील दारिद्र्याचा अभ्यास करणे.

२. भारतातील दारिद्र्य मापनाच्या विविध अभ्यास गटांचा आढावा घेणे.

**संशोधनाची गहितके :—**

१. भारतीय ग्रामीण क्षेत्रातील दारिद्र्याच्या प्रमाणात दिवसेदिवस घट होत आहे.

**संशोधन पद्धती :—**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला असून त्यात प्रकाशित व अप्रकाशित पुस्तके, मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्र, इंटरनेट व निरिक्षण इत्यादीचा वापर करण्यात आला आहे. संकलित माहितीच्या आधारे शोधनिबंधाची व्यवस्थित मांडणी करण्यात आली आहे.

**दारिद्र्याची संकल्पना :—**

दारिद्र्य ही एक अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. ती साधनसामुग्री, श्रमशक्तीचा वापर, रोजगार निर्मिती व प्रवर्तन इत्यादी घटकांशी निगडित आहे. सर्वसाधारणपणे दारिद्र्य म्हणजे मूलभूत गरजा न भागविता येण्यासारखी परिस्थिती अशी दारिद्र्याची व्याख्या केली जाते.व्यक्तीच्या किमान जीवनमानाच्या संकल्पनेशी संबंधित असणारी ही व्याख्या आहे.परंतु किमान जीवनमानाची संकल्पना प्रत्येक देशानुसार बदलत जाणारी असते. प्रत्येक देशातील आर्थिक व सामाजिक परिस्थिती समान नसते. त्यामुळे दारिद्र्याची कल्पना देशानुसार वेगवेगळी असते.

**दारिद्र्याची व्याख्या :—**

**अमर्त्य सेन** मते, व्यक्तीने जोपासलेल्या मूल्याप्रमाणे जीवन जगता न येणे म्हणजे दारिद्र्य होय. जी व्यक्ती अन्न, वस्त्र आणि निवारा या किमान गरजा भागविण्याकरीता पुरेसे उत्पन्न मिळवू शकत नाही किंवा या किमान गरजा भागविण्यास असमर्थ असते अशा व्यक्तीना दारिद्र्य असे म्हणतात. दारिद्र्य या संकल्पनेचा विचार करताना सापेक्ष दारिद्र्य आणि निरपेक्ष दारिद्र्य या दोन्ही संकल्पना विचारात घ्याव्या लागतात.

**सापेक्ष दारिद्र्य :—**

सापेक्ष दारिद्र्य म्हणजे एका व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या उत्पन्नाची दुसऱ्या व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या उत्पन्नासोबत तुलना करून जी सरासरी काढली जाते. त्याला सापेक्ष दारिद्र्य असे म्हणतात.

**निरपेक्ष दारिद्र्य :—**

निरपेक्ष दारिद्र्य म्हणजे जी व्यक्ती किंवा कुटूंब आपल्या किमाण किवा मुलभुत गरजा भागविण्यातरीता आवश्यक उत्पन्न मिळवू शकत नसेल किंवा आपल्या उत्पन्नातुन दैनंदिन गरजा भागवू शकत नसेल तर अशी व्यक्ती किंवा कुंटूंब दारिद्र्य आहे असे मानले जाते.

**विविध अभ्यासगटाने भारतातील ग्रामीण क्षेत्रातील दारिद्र्यावर व्यक्त केले अंदाज किंवा अहवाल :—**

भारतातील विविध अभ्यासगटातील अर्थशास्त्रज्ञांनी, संस्थांनी भारतातील ग्रामीण क्षेत्रातील दारिद्र्याचा अभ्यास करून आपआपले अंदाज व्यक्त केलेले आहेत.

**१) श्री.पी.डी. ओझा यांचा दारिद्र्याचा अंदाज(१९६२)**

दारिद्रयरेषेखालील लोकांची संख्या मोजताना श्री. ओझा यांनी सरासरी उष्मांकाचा आधार घेतला. दर दिवशी दरडोई २२५० कॅलरी उष्मांक आहार न मिळणारे कुटूंब दारिद्रय रेषेखालील आहे असे त्यांनी मत मांडले. सन १९६०–६१ च्या किमतीनुसार ग्रामीण भागात ८.११ रूपये तर शहरी भागात १५ ते १८ रूपये महिन्याला उपभोगावर खर्च झाले पाहिजेत असा अंदाज मांडला. १९६७–६८ मध्ये भारतातील ग्रामीण क्षेत्रातील दारिद्रय रेषेखाली लोकसंख्येचे प्रमाण ७० टक्के होते.

### २) डॉ. दांडेकर व श्री. रथ यांचे भारतीय दारिद्रयाचे अंदाज

डॉ. व्ही.एम. दांडेकर व श्री. निळकंठ रथ यांच्या मते, प्रत्येक माणसाला दररोज किमान २२५० उष्मांक देणारा आहार मिळाला पाहिजे. २२५०उष्मांक देणारे अन्न त्यांना घेता यावे यासाठी त्यांनी सन १९६०–६१च्या किमतीनुसार ग्रामीण लोकांना दरडोई वार्षीक १८० रूपये तर शहरी भागाकरीता २७० रूपये मिळाले पाहिजेत असा अंदाज त्यांनी मांडला होता. सन १९६८–६९ किमतीनुसार दरडोई वार्षिक उत्पन्नाची राशी ग्रामीण भागाकरीता ३२४ रूपये तर शहरी भागाकरीता ४८० रूपये ठरविण्यात आली होती.

### ३) अहलुवालिया समिती ग्रामीण दारिद्रयाचा अभ्यास (१९७७)

प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ मोंटेकसिंग अहलुवालिया यांच्या मते, सन १९६०–६१च्या किमतीनुसार किमान दरडोई मासिक खर्चाची पातळी ग्रामीण क्षेत्रासाठी १५ रूपये असावी तर शहरी भागाकरीता २० रूपये असावी. यांच्या अभ्यासाचे वैशिष्टय असे की बाजारातील चढउतारांचा ग्रामीण दारिद्रयावर महत्वाचा परिणाम होतो असे त्यांनी मत मांडले. त्यांच्या मते, शेती उत्पादनातील घट किंवा वाढ ग्रामीण दारिद्रयावर महत्वाचा परिणाम करते. शेती उत्पादन चांगले झाले की ग्रामीण दारिद्रयात घट होते. शेती उत्पादनात घट झाल्यास ग्रामीण दारिद्रयात वाढ करते.

### ४) प्रा.सुरेश तेंडूलकर समिती (२००८)

भारत सरकारने सन २००८मध्ये दारिद्रयरेषेचा अभ्यास करण्याकरीता प्रा.सुरेश तेंडूलकर समिती नेमली. या समितीने उपभोग खर्चाच्या आधारे दारिद्रय रेषा निश्चित करण्याचा नवीन पर्याय सुचविला. प्रत्येक कुटूंबास आपला किमान उपभोग पूर्ण करण्यास ज्या वस्तूची गरज असते त्याच्या किंमती लक्षात घेऊन त्याला लागणाऱ्या खर्चाच्या आधारे दारिद्रय रेषा निश्चीत करावी असा पर्याय सुचविला. यालाच त्यांनी राहणीमानाचा खर्च (Cast of living) असे नांव दिले. प्रा.सुरेश तेंडूलकर समितीच्या शिफारशीनुसार सन २००४–०५ या वर्षात भारतातील ३७.२ टक्के जनता दारिद्रयरेषेखाली असल्याचे प्रसिद्ध केले की, जी पूर्वीच्या दांडेकर आणि रथ समितीच्या सुत्रानुसार २७.५ टक्के येत होती.

### ५) डॉ. सी. रंगराजन समिती (२०१४)

सन २०११ मध्ये योजना आयोगाने सर्वोच्च न्यायालयात दारिद्रयरेषेच्या संबंधात दाखल केलेल्या शपतपत्रामध्ये असे म्हटले होते की, जी व्यक्ती आपल्या किमान गरजा भागविण्याकरीता दरदिवशी ग्रामीण भागात २६ रूपयांपेक्षा अधिक आणि शहरी भागाकरीता ३२ रूपयांपेक्षा अधिक खर्च करते अशी व्यक्ती दारिद्रयरेषेखाली नाही. योजना आयोगाची ही आकडेवारी तेंडूलकर समितीच्या अहवालावर आधारीत होती. योजना आयोगाच्या या शपतपत्रावर संपुर्ण देशात टिका होऊ लागली होती. या घटनेमुळे दारिद्रय रेषेखालील मुद्याचा अभ्यास करण्याकरिता डॉ.सी.रंगराजन समिती नेमली. या समितीने आपल्या अहवालात

२०११–२०१२ च्या किंमतीनुसार ग्रामीण भागाकरीता दरडोई ३२.४ रूपये आणि शहरी भागाकरीता दरडोई ४६.९ रूपये खर्चाची मर्यादा दिली.

**सी. रंगराजन समितीनुसार भारतातील दारिद्रय**

| वर्ष | दारिद्रयाचे प्रमाण | | | दारिद्रय रेषेखालील लोकसंख्या (दशलक्ष) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | शहरी | एकूण | ग्रामीण | शहरी | एकूण |
| २००९–१० | ३९.६ | ३५.१ | ३८.२ | ३२५.९ | १२८.७ | ४५४.६ |
| २०११–१२ | ३०.९ | २६.४ | २९.५ | २६०.५ | १०२.५ | ३६३ |
| दारिद्रयातील घट | ८.७ | ८.७ | ८.७ | ६५.४ | २६.२ | ९१.६ |

(Source: Report of the Expert group to Review the Methodology for measurement of poverty Govt. of India planning commission June 2014)

डॉ. सी. रंगराजन समितीने २००९–१० पासुन २०११–१२ पर्यंत कालावधीत ग्रामीण भागातील दारिद्र्यातील घट ८.७ टक्के आणि शहरी भागातील दारिद्र्यातील घट ८.७ टक्के झालेली आहे.

**भारतातील ग्रामीण क्षेत्रातील दारिद्रय :–**

जगातील दारिद्रयाविषयी वेगवेगळे निकष लावलेले आहेत. त्यात भारतातही काही निकष लावण्याकरीता किंवा दारिद्रय लोक कोणाला म्हणावे यासंबंधी श्री. पी.डी. ओझा, डॉ. दांडेकर व डॉ. रथ, श्री.मोंटेसिंग अहलुवालिया, प्रा. सुरेश तेंडूलकर, डॉ. सी. रंगराजन यासारख्या अर्थतज्ञांनी राष्ट्रीय नमुना पाहणीच्या आकडेवारीचा आधार घेत भारतातील दारिद्रयांचा अंदाज व्यक्त केलेला आहे. त्यांच्या मते, शहरी भागातील दारिद्रयरेषेखालील प्रमाणापेक्षा ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील प्रमाण अधिक प्रमाणात आढळून येतात. भारतामध्ये दारिद्रयांचे मोजमाप करतांना सामान्यता ग्रामीण दारिद्रय आणि शहरी दारिद्रय असे दोन भागात दारिद्रयाची आकडेवारी गोळा केली जाते.

| वर्ष | दारिद्रयाचे प्रमाण | | | दारिद्रय रेषेखालील लोक (द.लक्ष) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | शहरी | एकूण | ग्रामीण | शहरी | एकूण |
| १९७३–७४ | ५६.४ | ४९.० | ५४.९ | २६१.३ | ६०.० | ३२१.३ |
| १९७७–७८ | ५३.१ | ४५.२ | ५१.३ | २६४.३ | ६४.६ | ३२८.९ |
| १९८३–८८ | ४५.६ | ४०.८ | ४४.५ | २५२.० | ७०.९ | ३२२.९ |
| १९८७–८८ | ३९.१ | ३८.२ | ३८.९ | २३१.९ | ७५.२ | ३०७.० |
| १९९३–९४ | ५०.१ | ३१.८ | ४५.३ | ३२८.३ | ७४.५ | ४०३.७ |
| २००४–०५ | ४१.८ | २५.७ | ३७.२ | ३२६.३ | ८०.८ | ४०७.१ |
| २००९–१० | ३३.८ | २०.९ | २९.८ | २७८.२ | ७६.५ | ३५४.७ |
| २०११–१२ | २५.७ | १३.७ | २१.९ | २१६.७ | ५३.१ | २६९.८ |

(Source : Planning commission Estimates 2014)

वरील तक्त्यांचे अवलोकन करता असे दिसते की, १९७३–७४ पासून भारतातील ग्रामीण आणि शहरी दारिद्रयाचे प्रमाण कमी होत आहे. सन १९७३–७४ मध्ये ग्रामीण भागात ५६.४ टक्के आणि शहरी

भागात ४९.० टक्के दारिद्र्याचे प्रमाण आहे. तर २०११–१२ मध्ये भारतातील दारिद्र्याचे प्रमाण ग्रामीण भागात केवळ २५.७ टक्के आणि शहरी भागात केवळ १३.७ टक्केपर्यंत दारिद्र्याचे प्रमाण कमी झालेले आहे. याचा अर्थ भारत सरकारने ग्रामीण आणि शहरी क्षेत्रात दारिद्र्य निर्मुलनाकरीता ज्या विविध योजना राबविल्या त्यामुळे भारतातील दारिद्र्याचे प्रमाण ग्रामीण भागात आणि शहरी भागात कमी झाले दिसून येत आहे.

**भारतातील ग्रामीण भागातील दारिद्र्याचे कारणे :–**

**१. वेगाने वाढणारी लोकसंख्या :–**

भारतातील ग्रामीण भागात ज्या गतीने लोकसंख्या वाढत आहे. त्या गतीने राष्ट्रीय उत्पन्न वाढलेले नाही. त्यामुळे लोकांना आपल्या किमान आवश्यक गरजा पुर्ण करण्याकरीता आवश्यक उत्पन्न कमी पडू लागल्याने ग्रामीण भागात दारिद्र्य निर्माण झालेले आहेत.

**२. वाढते बेकारीचे प्रमाण:–**

भारतातील ग्रामीण भागात रोजगाराच्या अपुऱ्या सोयी व वाढती लोकसंख्या यामुळे भारतातील ग्रामीण भागात बेकारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. बेकारीमुळे खेडयातील लोकांना आपल्या किमान गरजा पुर्ण करण्याकरीता आवश्यक उत्पन्नच कमी मिळत असल्यामुळे भारतातील ग्रामीण भागात दारिद्र्य निर्माण झालेले आहे.

**१. आर्थिक विषमता :–**

भारतात उत्पन्न वितरणातील विषमतेमुळे मोठया प्रमाणात आर्थिक विषमता आढळते. रिझर्व्ह बॅकेच्या १९५५–५६ च्या अनुमानानुसार भारतात वरच्या स्तरातील ५० टक्के कुटूंबांना राष्ट्रीय उत्पन्नाच्या ७५ टक्के तर खालच्या स्तरातील ५० टक्के कुटूंबांना २५ टक्के उत्पन्न प्राप्त होते. खालच्या स्तरातील बहुसंख्य कुटूंबांना मुळातच कमी उत्पन्न प्राप्त होत असल्याने मोठया प्रमाणावर ग्रामीण भागात सुध्दा दारिद्र्य निर्माण झाले आहे.

**२. कृषीक्षेत्राकडे तुलनेत दुर्लक्ष :–**

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. आजही भारतात जवळपास ६७ टक्के लोक प्रत्यक्ष शेती व्यवसाय करतात, तर ३ ते ५ टक्के लोक कृषी पुरक व्यवसाय करतात. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात भारत उद्योग प्रधान निर्माण करण्याच्या हेतूने ७४ वर्षे सातत्याने ग्रामीण भागातील कृषी व्यवसायाकडे दुर्लक्ष करून औद्योगिकरण केंद्रित योजना आखल्या आणि प्रयत्न झाले. वाढते औद्योगिकीकरण, नागरीकरण, बेकारी व इतर वापरांसाठी लागणारी जमीन याचाही भर कृषीवरच पडत आहे. त्यामुळे वाढते तुकडीकरणामुळे उत्पादन रोजगार यावर परिणाम होतो. म्हणून सर्वाधिक दारिद्र्य रेषेखालील लोक ग्रामीण भागात राहतात.

**३. वाढती महागाई :–**

देशात चलनाचा पुरवठा सतत वाढत आहे. त्यामुळे पैशांची खरेदी शक्ती कमी होत आहे. आवश्यक वस्तू व सेवांच्या किंमती वाढत असल्याने अल्प दरडोई उत्पन्न असणाऱ्या लोकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होते. अल्प उत्पन्न व वाढत्या किंमतीमुळे बचतीचे प्रमाणात भांडवलाचा संचय दर कमी आहे. त्यामुळे भारतातील ग्रामीण भागातील दारिद्र्याचा प्रश्न आणखीच बिकट होत आहे.

**४. शिक्षणाचे अल्पप्रमाण :–**

भारतामध्ये ग्रामीण भागातील साक्षरतेचे प्रमाण हे कमी असल्यामुळे ग्रामीण भागातील लोकांमध्ये नविन ज्ञान, नविन कलाकौशल्य, नविन व्यवसाय इत्यादीचा अभाव जाणवतो. त्यामुळे त्यांना योग्य व्यवसाय करता येत नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील दारिद्रय टिकून राहत आहे.

**भारतातील ग्रामीण भागातील दारिद्रयरेषा दूर करण्यासाठी उपाययोजना :—**

भारतातील ग्रामीण भागातील दारिद्रय दुर करण्यासाठी केंद्र व राज्यसरकारने विविध योजना आखल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१. ग्रामीण रोजगारासाठी धडक योजना** (Crash Scheme for Rural Employment)

ग्रामीण भागातील प्रत्येक कुटूंबातील कमीत कमी एक सदस्याला रोजगार देण्यासाठी ही योजना १९७१ मध्ये तयार करण्यात आली. ही योजना चौथ्या योजनेपर्यंतच मर्यादीत होती. याकाळात ३.१५ लाख दिवस (एक व्यक्ती) रोजगार निर्माण करण्यात आला. १९७१—७४ याकाळात १७४ कोटी रूपये खर्च झाले. त्याप्रमाणात ही योजनाही फलदायी होऊ शकली नाही. परंतु ग्रामीण लोकांच्या हाताला काम देण्याचा हा चांगला प्रयत्न झालेला दिसून येतो आहे.

**२. किमान गरजांचा कार्यक्रम** (Minimum New Programme)

देशातील दारिद्रय दूर करण्याच्या उद्देशाने पाचव्या योजनेत हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. या कार्यक्रमासाठी २६.७ कोटी रूपयांची तरतुद करण्यात आली. सहाव्या योजनेत ती वाढवून ५८.०८ कोटी रूपयांची तरतुद करण्यात आली. किमान गरज कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश प्राथमिक व प्रौढ शिक्षणाचा विस्तार करणे, ग्रामीण भागात आरोग्याच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देणे, ग्रामीण भागात पिण्याचे शुध्द पाणी उपलब्ध करून देणे, ग्रामीण भागात रस्त्यांची सोयी करणे आणि ग्रामीण भागात विजेची सोय करणे इत्यादी उद्दिष्टे समोर ठेऊन प्रयत्न केले गेले.

**३. एकात्मिक ग्रामीण विकास योजना** (IRDP)

दारिद्रय निर्मुलन हे सहाव्या पंचवार्षिक योजनेचे महत्वाचे उद्दिष्ट होते. योजना आयोगाच्या अहवालानुसार सन १९७७ ते ७८ मध्ये भारतात ३०.२७ कोटी लोक दारिद्रय रेषेखाली होते. ही संख्या एकूण त्यावेळीच्या लोकसंख्येच्या ४८.१३ % होती. सहाव्या पंचवार्षिक योजना तयार करतांना योजनाकारांनी सन १९८४—८५ पर्यत एकूण दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येच्या ३०% लोकांना दारिद्रय रेषेच्या वर आणण्याचे उद्दिष्ट निश्चित केले होते. या योजनेत योजना आयोगाने दारिद्रय रेषेखालील कुटूंब निश्चित करताना ग्रामीण भागाकरीता २४०० कॅलरी व शहरी भागाकरीता २१०० कॅलरी उष्मांकांचे मापन निश्चित केले होते. दारिद्रय रेषेखालील कुटूंबांचा विकास करण्याकरिता भारत सरकारने २ ऑक्टोबर १९८० रोजी एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम सुरू केला. पहिल्याच वर्षी हा कार्यक्रम देशातील २३० विकास खंडामध्ये सुरू करण्यात आला. सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या अंतापर्यत या कार्यक्रमाचा विस्तार संपूर्ण देशात करण्यात आला. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाअंतर्गत दारिद्रय रेषेखालील कुटूंबांना आर्थिक सहाय्य देणे, शेतीकरीता अवजारे, बी—बियाणे व खते पुरविणे, दुग्धव्यवसायाकरिता पशू खरेदी करण्यास आर्थिक मदत करणे, अशा कुटूंबातील व्यक्तीकडे जमीन असेल, तर त्यांना विहीर खोदण्यास आर्थिक मदत देणे, इत्यादी कार्यक्रम सुरू करण्यात आले. हा कार्यक्रम राबविण्याकरीता स्वतंत्र एकात्मिक ग्रामीण विकास यंत्रणा निर्माण केली असून या कार्यक्रमाअंतर्गत दारिद्रयरेषेखालील कुटूंबाला अर्थसाहाय्य करण्याची जबाबदारी राष्ट्रीयकृत बॅकेकडे सोपविण्यात आली आहे. राष्ट्रीयकृत बॅक ४% दराने कर्जपुरवठा करते.

त्याचप्रमाणे दारिद्रय रेषेखालील कुटूंबांतील किमान एका व्यक्तीस नियमित रोजगार मिळावा म्हणून भारत सरकारने राष्ट्रीय ग्रामीण रोजगारासारखे कार्यक्रम सुरू केले.

**४. पंतप्रधान रोजगार योजना**

सुशिक्षित बेकार व्यक्तीला आपला व्यवसाय सुरू करण्याकरीता २ ऑक्टोंबर १९९३ रोजी ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेन्वये लाभधारकास रूपये सात लाखांपर्यत आर्थिक मदत दिली जाते. त्यामुळे ग्रामीण भागातील सुशिक्षित बेकारांना आपला व्यवसाय सुरू करण्यास मदत झाली आहे.

**५. सुवर्णजयंती ग्राम स्वय:रोजगार योजना**

भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयामार्फत एकात्मिक ग्रामीण विकास योजनेच्या जागी ही योजना सुरू करण्यात आली. १ एप्रिल १९९९ रोजी ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेमध्ये ट्रायसेस, ग्रामीण क्षेत्रातील महिला व बालविकास योजना या योजनेच्या एकत्रिकरणातून ही योजना सुरू करण्यात आली. सुवर्णजयंती ग्राम स्वय:रोजगार योजनेचा प्रमुख उद्‌देश दारिद्रयनिर्मुलनावर लक्ष केंद्रित करणे, स्वयंसहाय्यता गटांना मदत करणे आणि ग्रामीण भागात स्वयंरोजगार निर्माण करणे.

**६. अंन्त्योदय अन्न योजना**

भारतातील ग्रामीण भागातील गरीब लोकांवर लक्ष केंद्रीत करून ही योजना डिंसेबर २००० मध्ये सुरू करण्यात आली. ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील जनतेकरिता ही योजना सुरू करण्यात आली आहे. अंन्त्योदय अन्न योजनेचा प्रमुख उद्‌देश दारिद्रय रेषेखालील ग्रामीण भागातील जनतेला सवलतीच्या दराने अन्नधान्य पुरविणे, प्रत्येकी २रू. किलो ग्रॅम दराने गहू आणि प्रत्येकी ३ रू. किलोग्रॅम दराने तांदूळ पुरविणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे तसेच प्रत्येक कुटूंबाला २५ किलो धान्य पुरविण्यात येते.

**७. संपुर्ण ग्राम रोजगार योजना**

ग्रामीण भागातील जनतेला आश्वासित रोजगार पुरविण्याच्या उद्देशाने भारत सरकारने ही योजना सुरू केली. आश्वासित रोजगार योजना व जवाहर ग्राम संमृध्दी योजना यांच्या एकत्रिकरणातून २५ सप्टेंबर २००१ रोजी ही योजना सुरू करण्यात आली. संपुर्ण ग्राम रोजगार योजनेचा प्रमुख उद्‌देश ग्रामीण भागात टिकाऊ पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या उद्देशाने रोजगार पुरविणे, महिलांना जास्तीत जास्त रोजगार पुरविणे, ग्रामीण भागातील जनतेला अन्न सुरक्षा पुरविणे. आणि दारिद्रय रेषेखालील जनता, अनुसूचित जाती आणि जमातीची जनता यांना जास्तीत जास्त रोजगार पुरविणे.

**८. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना**

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम— २००५ अन्वये ही योजना सुरू करण्यात आली आहे. ही योजना २ ऑक्टोबर २००६ रोजी सुरू करण्यात आली. संपुर्ण ग्रामीण रोजगार योजना आणि राष्ट्रीय कामाकरिता अन्न योजनेच्या एकत्रिकरणातून ही योजना सुरू करण्यात आली. या योजने अन्वये कोणत्याही एका अकुशल व्यक्तीला एका आर्थिक वर्षात १०० दिवस रोजगार पुरविण्याची हमी देण्यात आली आहे. अशा योजने अन्वये कामाकरीता अर्ज करणाऱ्या व्यक्तीला अर्ज केल्यापासून पंधरा दिवसांच्या आत रोजगार पुरविला जाते.

**निष्कर्ष :—**

एकंदरीत भारतातील ग्रामीण क्षेत्रातील दारिद्रयाचे मोजमाप आणि अंदाज व्यक्त करण्याकरिता भारत सरकारने काही समित्या किंवा अभ्यासगट स्थापन केले. समित्यांनी अभ्यास करून काढलेले अंदाज आणि अहवालानुसार भारतातील ग्रामीण क्षेत्रातील दारिद्रयाचे आकडे मिळाले. त्यानुसार भारत सरकारने ग्रामीण

आणि शहरी क्षेत्रात दारिद्रय निर्मुलनाकरिता ज्या विविध योजना राबविल्या त्यामुळे भारतातील दारिद्रयाचे प्रमाण ग्रामीण भागात आणि शहरी भागात कमी झाले दिसून येत आहे. त्यामुळे भारत प्रगतीच्या वाटेवर जाण्यास मदत होईल. तसेच २१व्या शतकात भारत आर्थिक महासत्ता होण्याचे स्वप्न सुद्धा पुर्ण होण्यास मदत होईल हे सत्य नाकारता येत नाही.

**संदर्भ सूचीः–**

१. काकडे डॉ.जे.एम.,कावळे डॉ.एस.एस.आणि कायरकर डॉ.मनिष, भारतीय अर्थव्यवस्था, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, जुलै २०१९
२. यादव चंद्रभान, ग्रामीण विकास का आधार– कृषी, कुरूक्षेत्र मासिक, मार्च २०१९, पृष्ठ ५६
३. मायी डॉ.सी.डी., चौधरी भगीरथ, कृषी : आगे का रास्ता, योजना मासिक,जानेवारी २०२१,पृष्ठ ४६ ते ४९
४. सिंह रमेश, भारतीय अर्थव्यवस्था, १०वी आवुत्ती, मॅक्ग्रॉहिल एज्युकेशन इंडिया प्रायवेट लिमिटेड चेन्नई, २०१९
५. कणेर प्रा. अरूण, सामान्य अध्ययन भारतीय अर्थव्यवस्था, नाथे पब्लिकेशन लिमिटेड नागपूर, जानेवारी२०१७
६. कोळंबे श्री. रंजन, भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन पुणे, २०१४–१५
७. झामरे डॉ.जी.एन.,भारतीय अर्थव्यवस्था,पिंपळापुरे ॲण्ड कं.पब्लिशर्स नागपूर, ऑक्टोबर २०१४
८. सामान्य अध्ययन भारतीय अर्थव्यवस्था, प्रतियोगीता दर्पण आगरा, २०१५
९. अर्थसंवाद(त्रैमासिक), मराठी अर्थशास्त्र परिषद, खंड– ४४, अंक २
१०. Report of the Expert group to Review the Methodology for measurement of poverty Govt. of India planning commission June 2014